कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/ कोंनास्प /२०२१-२२/३०८६
दि. २९/०३/२०२२

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीने आयोजित केलेल्या ४६ व्या कोंकणी नाटयस्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून श्री नागेश महालक्ष्मी प्रासादिक नाटयसमाज, बांदोडे-फोंडा यानी सादर केलेल्या **''मुक्ति''** या नाटकास रु.१,००,०००/-रुपयांचे प्रथम पारितोषिक तर युवा एकवट, भोमा-फोंडा यांच्या **''कण्वपुरातलो महापूर''** नाट्यप्रयोगास रु. ७५,०००/-चे व्दितीय पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. तसेच रसरंग, उगवे यांच्या **''एवम् इन्द्रजित ''** या नाटकाची रु.५०,०००/-च्या तृतीय पारितोषिकासाठी निवड करण्यात आली आहे तसेच प्रत्येकी रु.२५,०००/-ची उत्तेजनार्थ पारितोषिके अपरांतमाची, ओल्ड गोवा यांच्या **''धुकोर ''** व स्वरसाधना सांस्कृतिक संस्था, मांद्रे यांच्या **''उगडयाक मेळ्ळो नागडो....''** या नाटकाने पटकावली.

उत्कृष्ट दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक सुशांत नायक याना ''मुक्ति '' या नाटकासाठी प्राप्त झाले असून वैभव कवळेकर यांनी '' कण्वपुरातलो महापूर'' नाटकासाठी व्दितीय पारितोषिक संपादन केले. तर तृतीय पारितोषिक ''एवम् इन्द्रजित '' नाटकासाठी निलेश महाले याना देण्यात आले.

पुरुष गटात वैयक्तिक अभिनयासाठी वैभव कवळेकर याना 'कण्वपुरातलो महापूर" नाटकातील (अभिजीत) या भुमिकेसाठी प्रथम पारितोषिक देण्यात आले असून व्दितीय पारितोषिक अंकुश पेडणेकर याना ''उगडयाक मेळ्ळो नागडो....'' नाटकातील (स्विपर १) भुमिकेसाठी प्राप्त झाले. अभिनयासाठीची प्रशस्तीपत्रे नारायण आशा आनंद (उगडो/नागडो) ''उगडयाक मेळ्ळो नागडो....'', मुयर मयेकर (पावलू) ''धुकोर '', वैभव नाईक (अमल) ''एवम् इन्द्रजित '', रुणाल कोलकणकर (इंद्रजित) ''एवम् इन्द्रजित '', प्रशांत सतरकर (सुखानंद) ''भाग्यचक्र'' व गौतम अनंत गावडे (प्रितम) ''इन सर्च ऑफ" याना प्राप्त झाली.

स्त्री गटात वैयक्तिक अभिनयासाठी डॉ. संस्कृती रायकर याना ''मुक्ति'' नाटकातील (आशा) भुमिकेसाठी प्रथम पारितोषिक जाहीर करण्यात आले असून शेफाली नाईक यानी ''कण्वपुरातलो महापूर''नाटकातील (समा) भुमिकेसाठी व्दितीय पारितोषिक संपादन केले. स्त्री गटात अभिनयासाठीची प्रशस्तीपत्रे दीपलक्ष्मी मोघे (फ्रास्कीना)''धुकोर'', ममता शिरोडकर (लक्ष्मी गौडा) "आवरण", साध्वी मावजेकर (निशा) ''मुक्ति'', प्रज्ञा कामत (विभा) ''गुढ मनाच्या गर्भतळात'', ऐश्वर्या संगीता भरत नायर (उर्वशी) ''इन सर्च ऑफ" व शर्मिला नाईक (चंपा) "सखाराम बाईंडर" याना प्राप्त झाली.

उत्कृष्ट नेपथ्यासाठीचे पारितोषिक सौमित्र बखले यानी "एवम् इन्द्रजित " नाटकासाठी प्राप्त झाले असून संदीप कळंगुटकर याना 'धुकोर' नाटकासाठी प्रशस्तीपत्रक देण्यात आले आहे. 'कण्वपुरातलो महापूर' या नाटकाच्या वेषभूषेसाठी अनिकेत नाईक यानी पारितोषिक मिळविले तर प्रशस्तीपत्र 'एवम् इन्द्रजित' नाटकासाठी शनया महाले याना देण्यात आले. प्रकाशयोजनेसाठीचे बक्षिस सुशांत नायक याना ''मुक्ति'' नाटकासाठी प्राप्त झाले असून प्रशस्तीपत्र निलेश महाले याना 'एवम् इन्द्रजित' नाटकासाठी देण्यात आले. रंगभूषेचे पारितोषिक हिमालय गावडे यानी 'आवरण' या नाटकासाठी प्राप्त केले असून अमिता नाईक याना 'एवम् इन्द्रजित' या नाटकासाठी प्रशस्तीपत्र देण्यात आले. उत्कृष्ट पार्श्वसंगीतासाठीचे पारितोषिक तानाजी गावडे यानी 'मुक्ति' या नाटकासाठी संपादन केले. तर सौरभ कारखानीस याना 'एवम् इन्द्रजित' नाटकासाठी प्रशस्तीपत्र देण्यात आले.

परीक्षकांच्या शिफारसीनुसार नाटयलेखनासाठी साईराज नाईक (रक्तखेळ),गौतम अनंत गावडे (इन सर्च ऑफ) व उल्हास यशवंत नायक (रुख चवरताना) यांना प्रशस्तीपत्रे देण्यात आलेली आहे.

खास स्पर्धेसाठी अनुवादित/रुपांतरीत/आधारीत नाटयसंहिता लेखनाचे पारितोषिक वसंत भगवंत सावंत यांच्या 'धुकोर' या नाटयसंहितेस देण्यात आले .

या स्पर्धेसाठी एकूण २४ प्रवेशिका विविध संस्थांकडून आल्या होत्या त्यातून १५ नाटके सादर झाली. या स्पर्धेचे परीक्षण डॉ. प्रसाद गुरव, श्री. अजित कामत व प्रा. दीपक आमोणकर या परीक्षक मंडळाने केले. पारितोषिकप्राप्त कलाकारांचे कला अकादमीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले असून या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभाची तारीख मागाहून जाहिर करण्यात येईल, याची नाट्यप्रेमी रसिकानी व स्पर्धकानी नोंद घ्यावी असे कला अकादमी तर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतः- प्रथम पारितोषिक विजेता ''**मुक्ति**'' या नाटकातील एक प्रसंग

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसएस